अत्यंत महत्त्वाचे/कालमर्यादा

सहकारातून समृध्दीकडे

सत्यमेव जयते

2025

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

५-बी.जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.०२०-२६१२२८४६/४७ Email Id comm.transfer2024@gmail.com

जा.क्र.आस्था/कक्ष-२/समुपदेशन/बदली धोरण-२५/गट-ब/२०२५ /624 दिनांक : - ३१ मार्च, २०२५

प्रति,

विभागीय सहनिबंधक,
(सर्व) (लेखापरिक्षण /प्रशासन) सहकारी संस्था

**विषय :- समुपदेशनाव्दारे सर्वसाधारण बदल्या — सन २०२५**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गट- व विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था वर्ग-२ सवंर्गातील बदलीपात्र अधिकाऱ्यांकडून समुपदेशन बदली धोरणानूसार पसंतीक्रम मागविण्याबाबत..**

संदर्भ :- या कार्यालयाकडील पत्र जा.क्र.आस्था/कक्ष-२/समुपदेशन/बदली धोरण-२५/ गट-ब/२५, दि.३१/०३/२०२५

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्राकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

समुपदेशन बदली धोरणाप्रमाणे माहे मार्च अखेर प्रसिध्द करावयाच्या यादया, आपल्या विभागातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था गट-ब व विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था वर्ग-२ सवंर्गातील बदलीपात्र अधिकाऱ्यांना पोहचविण्याकरिता संदर्भीय पत्राने आपणास कळविण्यात आले होते.

आता आपल्या विभागातील सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गट-ब व विशेष लेखापरिक्षक सहकारी संस्था वर्ग-२ सवंर्गातील बदलीपात्र अधिकाऱ्यांना शासन निर्णय दि.०९/०४/२०१८ मधील परिशिष्ट १ (अ) (टप्पा क्र.२) तसेच परिशिष्ट १ सोबतचे विवरणपत्र १ तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१७/ प्र.क्र.४१५/कार्या.१२ दि.२१/११/२०२२ नुसार विहीत नमुन्यातील पसंतीक्रम comm.transfer2024@gmail.com या ई-मेल पत्त्यावर दि.१५ एप्रिल २०२५ पूर्वी सादर करण्याबाबत आपलेस्तरावरुन सुचित करावे. तसेच बदलीपात्र अधिकाऱ्यांकडून विहीत विवरणपत्रातील पसंतीक्रम मुदतीत या कार्यालयास सादर होतील असे पहावे.

**( दिपक तावरे, भा.प्र.से. )**
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहिती व पुढील तात्काळ कार्यवाहीसाठी -

१. मा. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे (सस्नेह)

२. मा. आयुक्त वस्त्रोद्योग, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपुर (सस्नेह)
३. मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे (सस्नेह)
४. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय, मुंबई.
५. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. विशेष कार्य अधिकारी (लेखापरीक्षा मंडळ) (पदुम) महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध)महाराष्ट्र राज्य मुंबई
८. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
९. जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (सर्व)
१०. संबंधित बदलीपात्र अधिकारी.
११. कार्यासन अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान कार्यासन, मुख्यालय, पुणे

यांना कळविण्यात येते की, सदरचे पत्र सहकार आयुक्त कार्यालयाच्या संकेतस्थळावर दि.०१/०४/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात यावे.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

मा.प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय मुंबई-३२.